दिनांक ११/०८/२०२३

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १०/०८/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा.

## गैरकायदयाची मंडळी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अम. अप क्र १००५/२०२३ कलम १४३ भादवी सहकलम १३५ मपोकॉ | जिल्हाधिकारी कार्यालय मेन गेट अमरावती | १०.०८.२०२३ चे १३.२० वा दरम्यान<br><br>१०.०८.२०२३ चे २१.०२ वा | मपोउपनि वडडे पो स्टे गाडगे नगर अमरावती | १.अमोल इंगळे , २. मनोज वानखडे ,३. संदीप तायडे ,४.प्रशांत वाकोडे, ५.गौतम मोहोड, ६.सागर सोमकुवर, व इतर रा अमरावती | हकीकत अशा प्रकार आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचा आदेश क्र. पोआअ/विशा/कावसु/२९०१/२०२३ दिनांक ०८.०८.२०२३ नुसार कलम ३७(१)(३) मपोका ची अधिसुचना व प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत करण्यात आला असतांना सुध्दा वरील नमुद स्वराज्य सामाजिक संघटना,महा.राज्य, पक्षाचे कार्यकर्ते यांनी १३.२०वा ते १४.०० वादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयामागील आरडीसी कार्यालयासमोर रामगावचा रोड झालाच पाहीजे जय भिम जय भिम रामगावचा रोड झलाच पाहीजे अशा प्रकारची घोषणाबाजी केली त्यांनी प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याने तसेच गैरकायदयाची मंडळी जमवून नारेबाजी केल्याने त्यांचे विरुध्द कलम १४३ भादवी सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे गाडगे नगर अम. अप क्र १००६/२०२३ कलम १८६,१४१,१४३ भादवी सहकलम १३५ मपोकॉ | कामगार उपायुक्त कार्यालय अमरावती | ०९.०८.२०२३ चे १६.०० वा दरम्यान<br><br>१०.०८.२०२३ चे २२.३२ वा | मोहम्मद जाकीर शेख हसन वय ३५ वर्ष रा. सलीम नगर अंजनगाव सुर्जी ह.मु. हसन जमदार यांचे घरी पॅराडाइज कॉलनी अमरावती | राजेश वानखडे अध्यक्ष भिम ब्रिग्रेड संघटना व इतर ५० ते ६० कार्यकर्ते | हकीकत अशा प्रकार आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी हे उपायुक्त कार्यालय येथे मागील पाच वर्षापासून शिपाइ या पदावर कार्यरत आहे. दि.०९.०८.२०२३ रोजी फी कार्यालयात हजर असतांना श्री राजेश रा. वानखडे, संस्थापक अध्यक्ष, भिम ब्रिगेड संघटना व इतर ५० ते ६० कार्यकर्ते हे कामगार उपायुक्त यांचे कार्यालय अमरावती येथे दुपारी ०१.०० वा अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ मार्फत घेण्यात आलेली २०२१ भरती प्रक्रीयोचा निकाल २०२३ आले असून आपल्या मार्फत जाहीर करण्याबाबत या आशयाचे निवेदन देण्याकरीता कार्यालयात उपस्थीत झाले.परंतू कार्यालयातील अधिकरी वर्ग १. श्री पाटणकर (कामगार उपायुक्त) , २. राजदीप एम धुर्वे सहायक कामकार उप आयुक्त, हे शासकीय महत्वाच्या कामानिमीत्य कार्यालयाचे बाहेर असल्याने भिम ब्रिगेडच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत कार्यालयात गोंधळ घालून कार्यालयाचे मुख्य प्रवेश दवारामध्ये तसेच श्री राजदीप धुर्वे सहायक कामगार आयुक्त यांचे कॅबीनला कुलूप लावून मोठया आवाजात घोषणाबाजी केली. व साहेबांचे खुर्चीला हार घालून निवेदन चिकटविले व मोठया आवाजा घोषणाबाजी केली त्यावेळी कार्यालयीन अधिकरी कर्मचारी काही महीला व पुरुष हे हजर होते. त्यांचे कार्यालयीन कामामध्ये व्यत्यय आणून भिम ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष व कार्यकर्तेनी शासकीय कामात व्यत्यय निर्माण केला उक्त संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकत्याद्वारे करण्यात आलेल्या कृत्यामुळे एकुण तीन तास कार्यालयातील उपस्थीत कर्मचा-यांमध्ये भितीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. करीता शासकीय कामात व्यत्यय निर्माण करुन कार्यालयामध्ये गोंधळ घालणारे ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्त्यावर फौजदारी कार्यवाही करण्याबाबत तक्रार देत आहे. अशा फीचे लेखी फीर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | नागपुरीगेट अप क्र, ३८४/२३ कलम ३७९ भादवी | अलीम नगर अमरावती | दि. ०८/०८/२०२३ चे २३/०० वा ते दि . ०९/०८/२०२३ चे २२/०० वा दरम्याण<br><br>दखल दि. १०/०८/२०२३ चे ००/५३ वा | नाजीम खान नजर खान वय ३२ रा अलीम नगर अमरावती | अज्ञात | हकीकत आशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हा आठवड्यातुन ६ दिवस अँटो चालवुन १ दिवस बुधवार ह्या दिवशी पप्पु भाई चिवडा वाले याचे कडे मजुरीचे कामाकरिता जातो यातील फिर्यादीने त्याचे मालकीचा पँसेजर अँटो क्र, Mh २७-BW२४१२ हा दि ०८/०८/२०२३ रोजी रात्री २३/०० वा घरासमोर उभा करुन दि. ०९/०८/२०२३ रोजी बुधवार ला पप्पु ल चिवड्यावाले यांचे कडे कामाला जावुन रात्री २२/०० वा घरी परत आला असता त्याचे घरासमोर उभा केलेल्या अँटोची पाहणी केली असता अँटोची फोर्स कंपनीची बँटरी कि ३००० रु कोणीतरी अज्ञात चोराने वायर कढुन चोरुन नेली अशा फि.चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला विलंबाचे कारण - लागलीच तपासी /दाखल अधि ग्रेड पोउपनि गजानन विधाते पो.स्टे नागपुरीगेट अमरावती |
| ४ | सिटी कोतवीली अप.क्र. ३४२/२३ कलम ३७९ भादवी | इर्विन दवाखाना वार्ड नं १३ समोर अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि १०/०८/२३ चे ००.३० ते ०३.१५ वा दरम्यान माहीती ता वेळ दि.१०/०८/२३ च२१.०० <br><br>गुन्हा दा. ता.वेळ दि. १०/०८/२३ चे २२.२६ वा | यश बलदेव नाईक वय २३ वर्ष रा. पोटी ता. मुर्तीजापुर जि अकोला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की दि ०७/०८/२३ रोजी फि. ची नातेवाईक हिला पोटाचा त्रास होता म्हणुन मी तिला उपचारा करीता इर्विन दवाखाना येथे दुपारी ०१.०० वा दरम्यान भरती केले व तिची देखभाल करीत आहो दि. १०/०८/२३ रोजी अदाजे १२.३० वा दरम्यान रात्री वार्ड क्र १३ समोर व्हराड्यात बेचवर झोपलो असता रात्री 03.15 मला जाग आली तर माझे शर्टचे खिश्यात असलेला रिलयमी कँपनीचा मोबाईल कि. अं ८०००/- रु. Imei no. १) ८६१८१७०४२९२७९१८ दईविन दवाखाना वार्ड नं १३ समोर व्हराड्यात दि. १०/०८/२३ रोजी रात्री १२.३० वा ते ०३.१५ वा दरम्यान कोणीरती अज्ञात चोरट्याने चोरुन नेला वरुन मी पो, स्टे ला ये्वुन रिपोर्ट देत आहे अशा फि.चे जबाना रि वरुन व डी ओ सा आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## वाहणचोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपुरीगेट अप क्र ३८७/२३ कलम ३७९ भादवी | पठाण चौक अमरावती | दि. ०९/०८/२०२३ चे २०/०० वा ते<br>दि १०/०८/२०२३ चे २१/०० वा दरम्याण<br>दाखल दि. १०/०८/२०२३ चे २३/३६ वा | फैजान खान ईनायत खान वय २४ वर्ष रा मदीना मस्जिद जवळ तारखेडा अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादीने ओ एल एक्स वर जाहिरात दिली असता फिर्यादीच्या फोन वर फोन आला कि, आप R S२०० पल्सर मो सा क्र एम एच २७ बी आर ४४४२ गाडी बेचने है क्या, तेव्हा त्या फोन वरील ईसमाने म्हटले कि, मुझे गाडी देखना है, त्यावरून फि ने फि चे भावाला अमीन याला गाडी दाखविण्याकरिता गाडी घेवुन पठाण चौक येथे पाठवले त्यानी फि च्या भावाला गाडीची ट्रायल घेवुन येतो असे म्हणुन फि चे भावाने १५ मिनिट वाट पाहली असता सदर आरोपी याने गाडी परत आणली नाही त्याच्या फोन वर कॉल केला असता पेट्रोल संपले आहे गाडी लोटत आणत आहे, त्यानंतर काही वेळाने पुन्हा कॉल केला असता मोबाईल बंद होता वरुन सदर आरोपी ने गाडी पळुन चोरुन नेली अशा फि चे जबाणी रिर्पोट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## स्त्रीअत्याचार

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अम अप क्र ६२१/२०२३ कलम ३७६, ३७६;२;एन ५०६ भादवी | अमरावती | दि.०५.०१.२०२३ चे २.३० वा ते दि. २३.०५.२०२३<br><br>रि ता वेळ दि १०.०८.२०२३ चे २०.३७ वा | एक महीला | आकाश अडागळे रा. | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातिल नमुद आरोपी हा फिर्यादी हिचा नातेवाईक असुन त्याचे फि चे घरी येणे जाणे व त्याला फि चे घटस्पोट झाला आहे हि बाब माहित होती त्यामुळे त्याचे फिर्यादी सोबत जवळीक साधुन तिच्या मोबाईल नंबर वर संपर्क करून जवळीक साधुन दोघांमध्ये भेअी गाठी सुरु होवुन नंतर दोघांमध्ये प्रेम संबंध निर्माण झाले होते त्यात आरोपी याने फिर्यादी हिस लग्नाचे आमिष दाखवुन तिला नमुद घ ता वेळी व ठिकानी पाटिल यांच्या भाडयाच्या रूम वर कमल प्लाझा अमरावती येथे घेवुन जावुन रूममध्ये आपण लग्न करणार आहो असे म्हणुन जबरदस्तीने फिर्यादी हिच्या मनाविरुध्द शारीरीक संबंध प्रस्थापीत केले नंतर आरोपीने वेळोवेळी फिर्यादी सोबत लग्नाचे आमिष दाखवुन फिर्यादी हिचे इच्छेविरूध्द जावुन शारीरीक संबध केले नंतर आरोपीयाने फिर्यादी हीचे सोबत बोलणे कमी करून लग्न करण्यास नकार देवुन तुला जे करायचे ते करून घे अशी धमकी देवुन नंतर फिर्यादी हीने आरोपीस तिच्या बजाज कार्ड वरून दोन मोबाईल फोन किअ २२०००/रु तसेच ६००००/रु लोन काढुन दिले तसेच बचत गटावरून नगदी ५००००/रु सुध्दा दिले नमुद आरोपी याने फिर्यादी सोबत लग्न करतो असे म्हणुन तिची इच्छा नसतानां सुध्दा वारंवार शारीरीक संबंध ठेवले आहे अशा फिर्यादीचे लेखी तक्रार अर्जावरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे. राजापेठ अप.क्र. ७३१/२०२३ कलम ४९८अ, ३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि. | यवतमाळ | घ ता वेळ दि 11/8/2023 चे पुर्वी<br><br>दा ता वेळ दि 10/8/23 चे 22.26 वा | एक महीला | १.कुणाल संतोष व्यास अधिक ५ नातेवाईक रा. यवतमाळ | हकीकत अशाप्रकारे आहे की, फीर्यादी यांचे आरोपी क्र १ ते क्रं. ५ शारीरीक व मानसीक छळ केला अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अप क्र, ६२०/२०२३ कलम ३५४(ड) भादवी | अमरावती | दि.०८/०८/२०२३ चे १०.३० वा दरम्यान दाखल ता. वेळ दि.१०/०८/२०२३ चे १४.०३ वा | एक महीला | विनोद घोडेस्वार रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी ही कामावर जात असतांना आरोपी हा नेहमी फिर्यादीच्या पाठीमागे येवुन वारंवार पाठलाग करतो.फिर्यादी हीने आरोपी यास विचारण्याचा प्रयत्न केला असता आरोपी हा तेथुन निघुन जातो. फिर्यादी बद्दल आरोपी याने कामावरूल २ महीला यांना सुध्दा विचारपुस करत होता. दि.०८/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा दरम्यान फिर्यादी ही तिच्या घरून एक महीला यांच्या कामावर कुंभारवाडा येथे जात असतांना यातील आरोपी हा पाठलाग करीता फिरक्यादी हिचा विनयभंग केला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गन्हा दाखल |

## पळवुण नेणे

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अम अप क्र ६२२/२०२३ कलम ३६३ भादवी | अमरावती | दि ०९.०८.२०२३ चे १७.०० वा रि ता वेळ दि. १०.०८.२०२३ चे २२.२८ वा | एक महीला | शेषराव कांबळे वय २२ वर्ष रा. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातिल फिर्यादीची नातेवाईक हि फिर्यादीच्या नातेवाईक हिचे फोन वुन शेषराव कांबळेयाचे सोबत बोलत होती नमुद घ ता वेळी व ठिकानी यातिल फिर्यादी व घरातिल सगळे कामावरून घरी परत आलो असता यातिल फिर्यादीची नातेवाईक हि घरी मिळुन आली नाही तिचा इतरत्र व नातेवाईका कडे शोध घेतला असता मिळुन आली नाही त्यामुळे फिर्यादीला असे वाटले कि तिचे नातेवाईक सोबत फोन वर बोलनारा शेषराव कांबळे याने तिला पळवुन नेले असल्याचा संशय आहे वरून पो स्टे ला येवुन रिपोर्ट देत आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गाडगे नगर अप क्र १००४/२०२३ कलम २७९,३३७ भादवी | अमरावती | १०.०८.२०२३ चे ०९.०० वा दरम्यान<br><br>१०.०८.२०२३ चे १६.१९ वा | एक महीला | एम एच ३०एल ९१९८(ट्रक्स) चारचाकी चा चालक | हकीकत अशा प्रकार आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी ही तिचे सहकारी यांचे गाडी क्र एम एच २७ डी ई ९३५३ टाटा पंच ने डॉ गोडे कॉलेज येथे डयुटीवर जात असतांना वेलकम टी पॉइंट कडून येणा-या निळया रंगाच्या ट्रक्स चारचाकी चालकाने त्याचे वाहन भरधाव व निष्काळजीपणाने चालवून फीर्यादीचे चारचाकी वाहनाला डावीकडून येवून दोन्ही दरवाजाला धडक दिली त्यामुळे गाडीचे दोन्ही दरवाजे बेंड होवून फीर्यादीला छातीला तसेच डाव्या फासोडीला दुखापत झाली व सोबत असणा-या मैत्रीण यांना गुडघ्याला मुका मार लागला. धडक देणा-या गाडी चालकाला थांबवून नाव विचारले परंतू त्याने नाव न सांगता चारचाकी क्र एम एच ३० एल ९१९८ ट्रक्स चा चालक उध्दटपणे बोलून गाडी घेवून पळून गेला. अशा जखमीचे बयाणवरुन गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो.स्टे नागपरीगेट अमरावती अप क्र ३८६/२३ कलम महाराष्ट प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ ५(अ),(१),(२),९ प्राण्याचा छळप्रतिबंध | पठाण चौक अमरावी | दि.१०/०८/२३ चे ११/३० वा ते १२/०० वा<br><br>दि. १०/०८/२३ चे १४/३८ वा | सपोनि संदिप तोताराम हिवाळे पो.स्टे नागपुरी गेट अमरावती | १)अँटो चालक अब्दुल नदीम अब्दुल अजीम वय २८ वर्ष रा बिस्मील्लला नगर अमरावती मालवाहुक क् एम.एच. ४९ ए.आर ६६८१<br>२) गोवंश जनावरांचा मालक मुद्दशीर शफीक कुरेशी | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी पो.स्टाफ पोहेका २७७,४६४,नापोका १३०१,१३०७, असे पो.स्टे हद्दीत पेट्रोलींग दरम्याण ११/०० वा गुप्त माहीती मिळाल्या वरुन नमुद घटना ता.वेळी यातील फिर्यादी व पोलीस स्टॉफ दोन पंचा समक्ष मिळालेल्या पठाण चौक येथे जावुन थांबलो असता मिळालेल्या माहीती प्रमाने एक मालवाहु ु अँटो क्र एम.एच. ४९ ए.आर ६६८१ पठाण चौक कडे येत आहे े त्यास अडवुन त्यातील अँटो चालकास खाली उतरवुन त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव अब्दुल नदीम अब्दुल अजीम वय २८ वर्ष रा बिस्मील्लला नगर अमरावती असे सांगितले वरुन आम्ही पंचा समक्ष सदर अँटो मागील डाल्ययाची पाहणी केली असता सदर अँटोच्या मागील डाल्ययात गोवंश दिसुन आले सदर गोवंश जनावराचे पाय व मुडके े दोरीच्या साह्याने बांधुन त्यांना वाहणा मध्ये निर्दयतेने वागणुक देवुन त्याची कत्तली करण्याच्या उद्देशाने एकावर एक वाहनात कोंबुन भरुन अवैद्यरित्या वाहतुक करुन आल्याने दोन पंचा समक्ष दिसले सदर जनावराची पाहणी केली असता एकुण ७ जानवरे कि. अं. ४१००० रु चे मिळुन आले तसेच सदर अँटो चालकास जनावराचे मालका बाबत विचारणा केली असता सदर गोवंश जनावरांचा मालक मालक मुद्दशीर शफीक कुरेशी असे सांगितले जप्त करण्ययात आलेले गोवंश यांचे संरक्षण व संवर्धन करिता गोरंक्षण संस्था दस्तुर नगर अमरावती येथे दाखल करण्यात आले अशा प्रकारे े जप्त एकुण ७ गोवंश जनावरे किं . अं. ४१००० रु एक मालहवाहु ु तीन चाकी अँटो क्र एम.एच. ४९ ए.आर ६६८१ कि. अं. ८०००० रु ु असा एकुण १२१,००० रु चा माल जप्त केला व गोवंश |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अधिनियम १९६० कलम ११(घ),(ड),(च) | | | | | जनावराचा मालक यांचे हे ` कृत्य कलम महाराष्ट प्राणी संरक्षण अधिनियम १९९५५(अ),(१),(२),९ प्राण्याचा छळप्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११(घ),(ड),(च) प्रमाने होत असल्याने सदर चा गुन्हा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन दाखल |
| २. | पो..स्टे सिटी कोतवाली अप क्र ३४०/२०२३ कलम १२२ मपोका | बस स्थानक परीसर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.०९/०८/२३ चे २१.४५ वा<br><br>दा.ता.वेळ १०/८/२३ चे ००.२६ वा | सर तर्फे सपोउपनि रंगराव जाधव ब नं ९२१ पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | शेख येजाजउद्दीन उर्फ हनुमान शेख निजामउद्दीन वय ३५ वर्ष रा अलीमनगर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की आज दि.९/८/२३ चे २१.०० वा ते १०/८/२३ चे ०९.०० वा पोवेतो आम्ही व सोबत नापोका १२,पोका३२८,१५५२ असे आमची पो.स्टे हद्दीत स्वतःचे वाहनाची पेट्रोलींग डयुटी करीत असतांना २१.४५ वा चित्रा चौक येथे असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की ईतवारा बाजार परीसर अमरावती येथे एक ईसम अंधारात आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र चोरी सारखा गुन्हा करण्याचे उद्देशाने उभा आहे वरुण दोन पंच व पोस्टॉफ असे ईतवाराबाजार परीसपात एक ईसम उभा दिसला आम्ही व पो.स्टॉफ ला पाहुन पळुन जाण्याचे बेतात असतांना पो.स्टाफ मदतीने जागीच पकडुन त्यास पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख येजाजउद्दीन उर्फ हनुमान शेख निजामउद्दीन वय ३५ वर्ष रा अलीमनगर अमरावती असे सांगीतले त्याला संशईतरित्या हालचाल करीत असतांना दिसुन आला त्यावरुण त्याला रात्रीचे अंधारात उभा राहण्याचे कारण विचारले असता त्याने कोणतेही समाधानकारक उत्तर न देतो उडवाउडवीचे उत्तर दिलेत्यावरुण आम्ही दोन पंचाना घटनास्थळी बोलावुन त्याचो समक्ष आम्ही त्यानंतर सदर ईसमाचे अंगझडती पंचनामा करण्यात आला सदर ईसम हा चोरी करण्याचे ईराद्याने किंवा दखलपात्र गुन्हा करण्याचे ईराद्याने दिसुन आला वरुण सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ३४१/२०२३ कलम १२२ मपोका | बस स्थानक परीसर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.०९/०८/२३ चे २३.३० वा<br><br>दा.ता.वेळ १०/८/२३ चे ०२.२० वा | सर तर्फे सपोउपनि रंगराव जाधव ब नं ९२१ पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | अर्जुन सायुब ह्युसुनकर, वय ३० वर्ष, रा, बेतुल मध्यप्रदेश | हकीकत अशाप्रकारे आहे की आज दि.९/८/२३ चे २१.०० वा ते १०/८/२३ चे ०९.०० वा पोवेतो आम्ही व सोबत नापोका १२,पोका ३२८,१५५२ असे आमची पो.स्टे हद्दीत स्वतःचे वाहनाची पेट्रोलींग डयुटी करीत असतांना २३.३० वा बस स्थानक , अम. येथे असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की टोपे नगर अमरावती येथे एक ईसम अंधारात आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र चोरी सारखा गुन्हा करण्याचे उद्देशाने उभा आहे वरुण दोन पंच व पोस्टॉफ असे ईतवाराबाजार परीसरात एक ईसम उभा दिसला आम्ही व पो.स्टॉफ ला पाहुन पळुन जाण्याचे बेतात असतांना पो.स्टफ मदतीने जागीच पकडुन त्यास पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव अर्जुन सायुब ह्युसुनकर, वय ३० वर्ष, रा, बेतुल मध्यप्रदेश असे सांगीतले त्याला संशईतरित्या हालचाल करीत असतांना दिसुन आला त्यावरुण त्याला रात्रीचे अंधारात उभा राहण्याचे कारण विचारले असता त्याने कोणतेही समाधानकारक उत्तर न देतो उडवाउडवीचे उत्तर दिले त्यावरुण आम्ही दोन पंचाना घटनास्थळी बोलावुन त्याचो समक्ष आम्ही त्यानंतर सदर ईसमाचे अंगझडती पंचनामा करण्यात आला सदर ईसम हा चोरी करण्याचे ईराद्याने किंवा दखलपात्र गुन्हा करण्याचे ईराद्याने दिसुन आला वरुण सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. राजापेठ मर्ग क्र. ८३/२०२३ कलम १७४ जा.फौ. | घटनास्थळ - रिम्स हॉस्पीटल अमरावती घ.ता.वेळ - दि.09/08/2023 चे 21-45 वा. दा.ता.वेळ दि.10/08/2023 चे 02-42 वा. | चेतन सुरेंद्र देशमुख वय २८ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती | सुरेंद्र गुणवंतराव देशमुख वय ५४ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती | रोड अपघात (RTA) डोक्याला मार लागल्याने उपचारादरम्यान मृत्यु | थोडढियांत हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी सुरेंद्र गुणवंतराव देशमुख वय ५४ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती यांनी पो.स्टे. ला रिपोर्ट दिला की, त्यांचा मोठा मुलगा चेतन व त्याचे सोबत त्याचे तार मित्र कंपनीच गाडीने कंपनीचे कामानिमित्य वर्धा येथे गेले होते. परत येत असतांना रेल्वे गेट जवळ बायपास पासिंग जवळ कोण्यातरी कारने अपघात केला त्यामुळे फिर्यादीचा मुलगा चेतन सुरेंद्र देशमुख वय २८ वर्ष रा. धन्वंतरी नगर अमरावती यांच्या डोक्याला मार लागला व त्याला रिम्स हॉस्पीटल अमरावती येथे भर्ती केल्याची फोनव्दारे माहिती मिळाली. हॉस्पीटल येथे जावुन पाहिले असता फिर्यादीचा मुलगा आयसीयु मध्ये भर्ती होता. उपचारा दरम्यान मरण पावला. असा मरणाचा मेमो व फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून मर्ग दाखल करून तपासात घेतला. | ASI रविंद्र केने ब.नं. ७६६ पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर |

## जुगार रेड

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो ठाणे बडनेरा | अप क्र ५८०/२०२३ कलम १२ अ मजुका | चावडी चौक जुनी वस्ती बडनेरा | दि १०/०८/२०२३ चे १३/०० | दि १०/०८/२०२३ चे १५.३० | नापोका प्रविद्र राठोड ब.न १४५२ पोस्टे बडनेरा | सुमित बंडुराव महल्ले वय-२९ वर्ष रा.चावडी चौक जु.व.बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १) नगदी ११४५/- रू., २) ०१ ते १० आकडयाच्या वरली मटकाच्या चिठ्या ३) एक बॉल पेन, कि. अं. ५/- रू. असा एकुण ११५०/- रू. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो ठाणे बडनेरा | अप क्र ५८१/२०२३ कलम १२ अ मजुका | इस्लामी चौक जु.व. कायदा. | दि १०/०८/२०२३ चे १९/३० | दि १०/०८/२०२३ चे २१.०६ वा. | नापोका शशिकांत शेळके ब.न.१३६० पो,स्टे बडनेरा अम | अतुल यादवराव बोरकर वय ४६ रा. पिपरी यादगिरे ता. जि. अम. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन नगदी १०१५/- रू., २) ०१ ते १० आकडयाच्या वरली मटकाच्या चिठ्या ३) एक बॉल पेन, कि. अं. ५/- रू. असा एकुण १०२०/- रू. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो ठाणे बडनेरा | अप क्र ५८२/२०२३ कलम १२ अ मजुका | आठवडी बाजार नवी वस्ती बडनेरा. | दि १०/०८/२०२३ चे २१/०० | दि १०/०८/२०२३ चे २१.३४ वा. | सरतर्फे ASI अहेमद अली ब.नं.७८४ पोस्टे बडनेरा अमरावती | सागर गजानण पवार वय ३० वर्ष ग्राम लोणी ,ता. नांदगाव खंडेश्वर , जि. अम. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन नगदी १९७०/- रू., २) ०१ ते १० आकडयाच्या वरली मटकाच्या चिठ्या ३) एक बॉल पेन, कि. अं. ५/- रू. असा एकुण १९७५/- रू.. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पो ठाणे बडनेरा | अप क्र ५८३/२०२३ कलम १२ अ मजुका | बारीपुरा चौक जुनी वस्ती बडनेरा. | दि १०/०८/२०२३ चे २०/१० ते २१/०० वा. | दि १०/०८/२०२३ चे २२.५१ वा. | सरतर्फे सहा पोलीस उप.नि. राजेंद्र माणिकराव काळे ब.न. ८५३ गुन्हे शाखा अम. शहर . | प्रतिक विजय श्रावणे वय २५ वर्ष रा. वायगाव हळदे ता. समुद्रपुर ,जि. वर्धा , ह.मु. बारीपुरा चौक जुनी वस्ती बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन २१५०/- रू., २) ०१ ते १० आकडयाच्या वरली मटकाच्या ४ चिठ्या ३) एक बॉल पेन, कि. अं. १०/- रू., एक रियलमी कपनीचा काळ्या रंगाचा कि. अ. १००००, रु. असा एकुण १२,१६०/- रू. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन रेड

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | `नांदगावपेठ | अप क्र २९५/२३ कलम ६५ ई मदाका | सिवनगाव नदीच्या काठी विहीरी जवळ | दि १०/०८/२३ चे १८/०० वा | दि १०/०८/२३ चे २०/५० वा | सरतर्फे पोहवा मोहन धोंडे ब.न. १००२ पोस्टे नांदगावपेठ अमरावती शहर | १) राजा उर्फ बाबु सकिंदर पवार वय ३० वर्षे रा.घोळ गव्हाण पोस्टे बडनेरा ह.मू.शेंदोळा बु जि अमरावती २) किशोर राधेशाम भोसले ो रा.शेदोळा बु जि अमरावती | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पोस्टाफ सह पोस्टे हद्दीत पेर्टोलिंग करित असतांना मिळालेल्या गृप्त माहीती वरुन पंचा समक्ष प्रोव्हीशन रेड केली असता दारु पिणारे लोक पळुन गेले व नमुद आरोपी याचे ताब्यातुन एका डबकी मध्ये ५ लिटर गावराणी हा.भ.ची.दारु कि.अं.५०० रुपये व एक मोटरसायकल क्र एम.एच.२७ डब्लु ८१३० कि.अं.१०,००० रुपये असा एकुन १०५०० रुपयेचा माल जप्त करण्यात आला.व आरोपी क्र २ हा फरार झाला अशा फि यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो.स्टे नागपुरीगेट | ३८५/२३ कलम ८५(१),(२)मदाका | सिद्धीकी अकबर मस्जीद जवळ जाकीर कॉलणी अमरावती | दि. ०९/०८/२०२३ चे २२/४५ वा | दि. १०/०८/२०२३ चे ०१/२५ वा | ग्रेड पोउपनि गजानन विधाते पो.स्टे नागपुरीगेट | शेख तौफीक शेख रफीक वय २२ रा कमेला ग्राउंड अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी दारुच्या नशेत जोर जोराने ओरडुन असभ्यतेचे गैरवर्तन करतांना मिळुन आला नमुद आरोपी चे वैद्यकीय तपासणी केली असता नमुद आरोपी हा दारु च्या नशेत आहे. असा लेखी अभिप्राय एम ओ.सा यांनी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | वलगाव | अपक्र. 245/2023 कलम 65 ई. | ग्राम शिराळा | दि.10/08/2023 चे 18/00 वा, | दाखल दि.10/08/2023 चे 23/12 वा, | ASI दादु दहिकर ब.न 919 पोस्टे वलगाव अमरावती शहर. | प्रफुल रामकृष्ण हरडे वय 50 वर्ष रा.ग्राम शिराळा ता.जि.अमरावती. | दि.10/08/2023 चे 18/00 वा. महोदय, सविनय सादर कि,आम्ही स.पो.उप.नि दादु बुडा दहीकर ब.नं.919 सोबत PC सतिश भुरे ब.नं.1818 पो.स्टे.वलगाव, अमरावती शहर लेखी फिर्याद देतो कि, आज दि.10/08/2023चे दुपारी 15/00 ते रात्री 21/00 पो.स्टे. ला हजर डयुटी असतांना अंदाजे 17/30दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि,ग्राम शिराळा वार्ड नं. 06 येथे एक इसम आपले घरासमोरील पानठेला मध्ये अवैधरित्या बिना परवाना देशी दारुची विक्री करीता आहे. अशा माहीतीवरुन आम्ही सोबत पो.काँ सतिश भुरे ब.नं. 1818 पो.स्टे वलगाव अम.शहर असे मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टे सरकारी वाहनाने रवाना होवुन ग्राम शिराळा येथे जाउन पंचाना बोलावुन पंचाना प्रोव्ही रेड बदल माहीती देवुन आम्ही पो.स्टफ ,पंच असे सरकारी वाहन दुर उभे करुन लपतछपत जावुन पाहणी केली असता एक इसम आपले राहते घरासमोरील पानठेला मध्ये अवैधरित्या बिनापरवाना देशी दारुची विक्री करीता असतांना दिसुन आला.त्याचेवर सायंकाळी 18/00 दरम्यान आम्ही पो.स्टफ व पंचसह प्रो.व्ही रेड केली असता पोलीसांची चाहुल लागताच दारु पिणारे लोक पळुन गेले व दारु विक्री करणा-या इसमाला जागीच ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव प्रफुल रामकृष्ण हरडे वय 50वर्ष रा. ग्राम शिराळा वार्ड नं 06 ता.जि.अमरावती असे सांगीतले त्याचे ताब्यातील प्लास्टीक पिशवीची पाहणी केली असता प्लास्टीक पिशवीमध्ये देशी दारु संत्रा बबी 180 MLचे 14नग प्रत्येकी किंअं..70/- रुपये असा एकुण 980/- रुचा माल मिळुन आल्याने सदरचा माल जप्ती पंचनाम्याप्रमाणे पंचासमक्ष जप्त केला नमुद आरोपीचे कृत्य कलम 65 (ई)म.दा.का प्रमाणे होत असल्याने सरकार तर्फे कायदेशीर आरोपी विरुध्द लेखी फिर्याद आहे. वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | भातकुली | अपक्र 158/23 कलम 65 (ई) मदाका | हॉटील साईयोगी लांन ता. भातकूली जि. अमरावती | दि. 10/08/2023 चे 18/30 वा. ते 18/35 वा. | दि. 10/08/2023 चे 20/17 वा. | सरतर्फे HC अब्दूल रहीमबं.नं. 22 पो.स्टे. भातकूली | गोविंद श्यामसूद्र जोशी वय 39 वर्षे रा. कूभारवाडा दत्त मंदीराचे बाजूली ओम श्री अपार्टमेन्ट प्लँट क्र. 201 निळकंठ चौक | हकीकत अश्या प्रकारे आहे की आम्ही सरतर्फे HC अब्दूल रहीम बं.नं. 22 पोलीस स्टेशन भातकूली अम. शहर सोबत पोका 1850, 1715 असे आज दि. 10-08-2023 रोजी 18/30 वा. दरम्यान पो.स्टे हद्दीत पो.स्टे. चे मोबाईलने पेट्रोलिंग करीत असता गूप्त बातमीदाराकडून माहीती मिलाली की, हॉटील साई योगीता. भातकूली येथे एक ईसम अवैध्द रित्या दारू विक्रीकरीत आहे अश्या माहीती वरून आम्ही पो.स्टाप व पंच असे 19/00 वा. हॉटील साईयोगी येथे जाउन त्याचे वर पंचा समक्ष रेड केला असता दारू बाळगणारा ईसम जागीच मिळून आला त्यास |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | अमरावती ह. मू. हाँटेल साईयोगी भातकूली | त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गोविं दश्यामसूद्र जोशी वय 39 वर्षे रा. कूभारवाडा दत्त मंदीराचे बाजूली ओमश्री अपार्टमेन्ट प्लँट क्र. 201 निळकंठ चौक अमरावती ह.मू. हाँटेल साईयोगी भातकूली असे सांगीतले त्याची दारूबाबत झडती घेतली असता त्याचे जवळ एका प्लाँस्टीक चूमडी मध्ये 24 नग देशी दारू 180 ML च्या देशी दारूने भरलेल्या सिलबंद पावट्या किमंत अंदाजे 1920 रू व दारू विक्रीचे नगदी 1600 रू असा ऐकून 3520 रू चा प्रोव्हीमाल मिळून आल्याने सदर देशी दारू बाळगने अगर विक्री बाबत परवाना विचारले असता नसल्याचे सांगीतले वरून सदर देशीदारू पावट्या पंचा समक्ष जप्त करून ताब्यात घेतला आरोपीचे कृत्य कलम 65 (ई) मदाका प्रमाने होत असल्याने आरोपी विरूध्द सदर चा गून्हा सदरचा दाखल |